**नियमित दिवाणी मुकदमा नंबर २९७/२०२३ मधील निशाणी क्र.०५ खालील आदेश**

(गौरी शशिकांत कदम + १विरुध्द परशुराम केशव कदम + ६)

(CNR No.MHST130009502023)

०१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ३९ क्रम १ व २ नुसार प्रतिवादी यांचे विरुध्द तुर्तातुर्त/तात्पुरती ताकीद देणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी सदर अर्जावर म्हणणे दिले नाही व कैफियतही दाखल केली नाही. प्रतिवादी क्रमांक ७ बँक यांनी नि.क्र.४४ब वर सदर अर्जावर म्हणणे व कैफियत दाखल केली आहे व सदर अर्जावर आक्षेप घेतलेला आहे.

०२. वादीने सदर अर्जामध्ये दाव्याच्या अंतिम निकाला पर्यंत दावा मिळकतीची प्रतिवादी क्रमांक १ ते ७ यांनी विक्री करु नये. दावा मिळकतीचे स्वरुपात बदल करु नये व वादीस दावा मिळकती मधून हुसकावून लावू नये व दावा मिळकतीचा कोणताही व्यवहार व विक्री करु नये. दावा मिळकतीवरील असलेला बोजा थकीत कर्ज रक्कम रुपये १५,०५,५६१/- भरुन बँकेकडून ताबा परत मिळवावा व इतर दावा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये. तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी क्रमांक १ ते ७ चे विरुध्द देणेत यावी व तात्पुर्ता मनाई हुकूम देण्यात यावा. दावा मिळकतीचे अंतरिम निकालापर्यंत कोणत्याही प्रकारचे दान, गहाण, बक्षीसपत्र अगर त्याचा लिलाव करण्यात येवू नये, अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०३. वादी विधीज्ञ श्रीमती गौरी कदम व प्रतिवादी क्रमांक ७ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. कोळेकर यांचा युक्तिवाद ऐकला.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्रमांक ७ बँक यांचा नि.क्र.४४ वरील अर्ज गुणावगुणावर निश्चित करणेत आलेला आहे व आदेश पारित करणेत आलेला आहे. नि.क्र.४४ अर्जावरील कारणमिमांसेनुसार, *''बँकेने दावा कलम १क घर मिळकत मालमत्ता क्रमांक ७२० वर तारण गहाण ६१९/२०१८ ची प्रत दाखल केलेली आहे. तसेच, दावा कलम १ क घर मिळकत मालमत्ता क्रमांक ७२० च्या गाव नमुना आठ यावर प्रतिवादी क्रमांक ७ यांचे बोजा चढवल्याचे दिसून येत आहे. Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security*

*Interest Act, 2002 (आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुर्नरचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ SARFAESI Act 2002) चे कलम ३४ नुसार दिवाणी न्यायालयाला अधिकारक्षेत्राची बाधा येते. तसेच, प्रतिवादी क्रमांक ७ यांनी Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 (आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुर्नरचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ SARFAESI Act 2002) या कायदया अंतर्गत कारवाई सुरु केली असल्याचे दिसून येत आहे. SARFAESI ACT 2002 अंतर्गत प्रतिवादी क्रमांक ७ बँक यांना कायदेशिर कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार आहे, असे दिसून येते. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी वर नमूद दाखल केलेले केस लॉ मधील गृहितके सदर प्रकरणाला लागू होत असल्याचे दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश VII नियम ११ (ड) प्रमाणे वादीचे दाव्याचे वादपत्र फक्त प्रतिवादी क्रमांक ७ विरुध्द फेटाळणे न्यायोचित होणार आहे''.*

०५. नि.क्र.४४ वरील आदेशानुसार, ''प्रतिवादी क्रमांक ७ चा नि.क्र.४४ वरील अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो व दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश VII नियम ११(ड) प्रमाणे वादीचे दाव्याचे वादपत्र प्रतिवादी क्रमांक ७ विरुध्द फेटाळणेत येते'', असा आदेश पारित केला आहे.

०६. नि.क्र.४४ वरील कारणमिमांसा व आदेशानुसार वादीचा सदरचा नि.क्र.०५ तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज फेटाळणेत येतो. त्याकरीता आदेश –

**<u>आदेश</u>**

१. वादीचा तुर्तातुर्त (तात्पुरता) ताकीदीचा अर्ज निशाणी ०५ नामंजुर करण्यात येतो. (फेटाळण्यात येतो).

२. खर्चाबाबतचा आदेश अंतिम निर्णयाच्या वेळेस ग्राह्य धरण्यात येईल.

पाटण, जिल्हा सातारा. (चेतना य. नेवारे)

दि.१०.०४.२०२४. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,पाटण